# तपश्चर्या इंग्रजीची

'स्पिक ॲण्ड स्प्लॅन' शाळेने विद्यार्थ्यांची इंग्रजी बोलण्याची सर्व जबाबदारी स्विकारली आहे. आम्ही पालकांना सांगतो घरी तुम्ही तुमच्या मातृभाषेतच मुलांशी बोला. इंग्रजी बोलून घरचं वातावरण विनाकारण कृत्रिम नका करुन टाकू. मुलाला इंग्रजी शिकवणे ही पूर्णपणे शाळेची जबाबदारी आहे तेव्हा आमच्या घरचं वातावरण मराठी आहे, कसं येणार त्याला इंग्रजी बोलता, ही काळजी तुम्ही करु नका.

१९९० साली जेव्हा 'स्पिक ॲण्ड स्प्लॅन' सुरु केली. तेव्हा मुलांच्या अवती भोवती राहून त्यांना एकमेकांशी व शिक्षिकेशी बोलण्यासाठी लागणाऱ्या वाक्यांची निवड केली व जवळ जवळ १५० वाक्य नर्सरीत, तेवढीच के.जी I व के.जी II त शिकवली. यात टिचर मराठीत वाक्य सांगतात व विद्यार्थी ताबडतोब त्या वाक्यांचं इंग्रजीत भाषांतर करतात.

नर्सरी, के.जी I व के.जी II साठी लागणारे बरेच शब्द Picture Dictionary त न मिळाल्याने जे शब्द चित्ररुपात दाखवले नाही अशा शब्दांसह आम्ही आमच्या २५० शब्दांच्या Picture Dictionary तयार केल्या. चित्रावर बोट ठेवल्याबरोबर विद्यार्थी भराभर शब्द सांगतात.

तसेच विरुद्धार्थी शब्दांसाठीपण आम्ही आमच्या Picture Dictionary तयार केल्या आहेत.

तसेच वर्गात विद्यार्थी १५० म्हणींसाठी तयार होतात. पहिल्या वर्गानंतर Complexity वाढत जाते. पहिली, दुसरीत असं लक्षात येतं की मुलांना खूप प्रश्न विचारायचे असतात पण ते प्रश्न विचारु शकत नाही. तेव्हा १५० प्रश्नच संभाषणासाठी निवडण्यात आले.

इंग्रजी वाक्यांची फेक जास्त प्रभावी होण्यासाठी १०० Tongue Twisters ची मदत होते.

तसेच पुढे पुढे खूप आशय असलेली पण छोटी छोटी वाक्य कशी बोलता येतील यासाठी ४०० वाक्यांचे संभाषण / Conversation अभ्यासक्रमात

समाविष्ट करण्यात आले आहे.

थोडक्यात पण नेमक्या शब्दात बोलण शक्य व्हावं म्हणून जवळ जवळ २५० समूहवाचक शब्द विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले.

छोटया छोटया वाक्यांमधून संपूर्ण आशय / अर्थ पोहोचवण्यासाठी इंग्रजी शब्दांना प्रत्यय लावल्यास शब्दांचं सौंदर्य तर वाढतंच पण इंग्रजी भाषेवरचं प्रभुत्व हा कौतुकाचा विषय ठरतो. म्हणून एक वेगळा Affixation चा Module तयार केला आहे.

हळूहळू पण भक्कम असा इंग्रजीचा पाया तयार झाल्यावर अभ्यासाची भीतीच मुलांच्या मनातून निघून जाते या सर्व इंग्रजीच्या विकासासाठी जे वेगवेगळी Module आम्ही तयार केलेत त्याला नाव दिलं Conversation. खऱ्या अर्थाने हे Conversation नाही, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. पण या वाक्यांशिवाय Conversation होऊ शकणार नाही म्हणूनच या इंग्रजी भाषेच्या विकासाला नाव दिलं आहे Conversation. इंग्रजी बोलण्यासाठी व्याकरणाचा सखोल अभ्यास ओघानेच आला म्हणून प्रत्येक वर्गात व्याकरणाचा वेगळा पेपर घेतला जातो. विद्यार्थ्याने व्याकरणदृष्टया बिनचूक पण ओघवत्या भाषेत बोलावे म्हणून शाळा सतत प्रयत्नशिल असते.

प्रत्येक शब्दाला जास्तीत जास्त पर्यायी शब्द देण्याचा शाळेचा सतत प्रयत्न असतो. मग एक एक शब्दाला अनेक समानार्थी शब्द (synonyms) दिल्या गेल्यामुळे शब्दसंपदा वाढवणे विद्यार्थ्यांना सहज सोपे जाते. विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात इंग्रजीच बोलले पाहिजे अशी सक्ती केल्यामुळे अगदी पहिल्या वर्गापासून इंग्रजीत संभाषण सुरु होते.

तसेच रोज Spelling test दिल्यामुळे बिनचूक Spelling लिहिलेच पाहिजेत यावरही शाळेने विशेष भर दिला आहे.

आता राहिले Orthoepy म्हणजेच ध्वनीशास्त्राप्रमाणे शब्दांचा उच्चार करण्याचे शास्त्र. तो विद्यार्थ्यांनी अचूकरित्या करावा असा शाळेद्वारे प्रयत्न असतो. तेव्हा १४ वर्ष इंग्रजीसाठी घेतलेल्या या अविरत प्रयत्नांना यश आल्यामुळेच 'स्पिक ॲण्ड स्पेॅन' च्या विद्यार्थ्यांना, हायर इंग्रजीतील शिक्षण, मराठी माध्यमा इतकं सोपं झाल.